## शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित

### सूचना

खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ६ गावांच्या मंजूर विकास योजनेची फेरतपासणी करून त्यात सुधारणा करणे व उर्वरित २६ गावांसाठी विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे [महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार]

क्र. सिडको/खोपटा /नियोजन/बी.एन.१९

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ४० च्या उप कलम (१) खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस १२०८/१७३९/प्र.क्र.१४२/२००२/नवि-१२, दिनांक १३ नोव्हेंबर २००३ व सम संख्येची अधिसूचना दिनांक २२ नोव्हेंबर २००५, अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रासाठी ३२ गावे (रायगड जिल्ह्याच्या पनवेल तहसीलची ७ गावे आणि उरण तहसीलची २५ गावे) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, विभागीय आयुक्त, कोकण विभागाने दिनांक १८ मे २००६ रोजी महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ अंतर्गत उरण आणि पेण तालुक्यातील ४५ गावांमध्ये महामुंबई इंटिग्रेटेड एसईझेड (एमआयएसईझेड) घोषित केले. ज्या मध्ये खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील २१ गावे समाविष्ट आहेत आणि एमआयएसईझेड सीमेमुळे वेगळे पडल्यामुळे खोपटा नव नगरातील इतर ५ गावांनी उर्वरित खोपटा नाव नगर, क्षेत्राशी संलग्नता गमावली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमांच्या कलम २६ अंतर्गत खोपटा नव नगरातील ६ गावांसाठी [बारापाडा, कर्नाळा (तारा), डोलघर, साई, कासारभट, दिघाटी] विकास योजना तयार करून दिनांक ३ एप्रिल २००८ रोजी प्रकाशित केली. महाराष्ट्र शासनाने नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस १२०९/९३२/प्र.क्र. ३९०/०९/नवि-१२, दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम ३१ अंतर्गत खोपटा नव नगरातील ६ गावांसाठी विकास नियंत्रण नियमावलीसह विकास योजना EPs वगळून मंजूर केली व सम संख्येची अधिसूचना दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ द्वारे वगळलेल्या भागास (Excluded Parts-EP) मंजुरी दिली ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने दिनांक १३ नोव्हेंबर २०१७ आणि २ जून २०२१ रोजीच्या पत्रांद्वारे खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील उर्वरित २६ गावांची विकास योजना तयार करून प्रकाशित करण्यासाठी सिडकोला निदेश दिले ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र. २३६/१८/कलम ३६(१कक)/नवि-१३, दिनांक २ डिसेंबर २०२० द्वारा एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) खोपटा नव नगरासाठी लागू करण्याचे कलम १५४ अन्वये निदेश दिले. उक्त नियमावलीत नमूद जमीन वापर झोन हे खोपटा नव नगरतील ६ गावांच्या मंजूर विकास योजनेतील झोन तसेच उर्वरित २६ गावांच्या नव्याने तयार करण्यात येणाऱ्या विकास योजनेतील झोन यांसोबत सुसंगत असावेत यासाठी उर्वरित २६ गावांची विकास योजना तयार करीत असतांना उक्त अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये ६ गावांच्या मंजूर विकास योजनेची फेरतपासणी करून त्यात सुधारणा करणेची आवश्यकता आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २३ च्या उप कलम (१) अन्वये "नियोजन प्राधिकरण, सर्वेक्षण करण्यापूर्वी आणि कलम २१ मधील तरतुदीनुसार क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्यापूर्वी ठरावाद्वारे, विकास योजना तयार करण्याचा त्यांचा उद्देश असल्याचे घोषित करील ;

आणि ज्याअर्थी, महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक १६ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. १२४७३ खालीलप्रमाणे पारित केलेला आहे :—

(१) असा ठराव पारित करण्यात येतो की संचालक मंडळ याद्वारे **महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६** च्या कलम ३८ च्या अन्वये खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ६ गावांच्या मंजूर विकास योजनेची फेरतपासणी करून त्यात सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

(२) पुढे असाही ठराव पारित करण्यात येतो की संचालक मंडळ याद्वारे **महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम. १९६६** च्या कलम २३ च्या उप कलम (१) अन्वये खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील ३२ गावांसाठी विकास योजना तयार करण्याचा उद्देश घोषित करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देत आहे.

(३) पुढे असाही ठराव पारित करण्यात येतो की मुख्य नियोजनकार(नैना) यांना याद्वारे विकास योजना तयार करण्याचा उद्देश घोषित करण्याविषयी व जनतेकडून सूचना व आक्षेप मागविण्यासंबंधी **शासन राजपत्रात** आणि विहित नमुन्यात वर्तमानपत्रात नोटीस प्रसिद्ध करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

म्हणून, महामंडळ, उक्त अधिनियमाच्या कलम २३ च्या उप कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून याद्वारे खोपटा नव नगर अधिसूचित क्षेत्रातील, इरादा जाहीर करण्याच्या सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे, ६ गावांच्या मंजूर विकास योजनेची फेरतपासणी करून त्यात सुधारणा करणे व उर्वरित २६ गावांसाठी (अधिसूचित क्षेत्रातील विभाजित अथवा एकत्रित झालेली गावे समाविष्ट) विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करत असल्याची सूचना जारी करीत आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत सूचना व आक्षेप असतील त्यांनी ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेच्या तारखेपासून साठ (६०) दिवसांच्या आत मुख्य नियोजनकार(नैना) यांचे कार्यालय, आठवा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना व आक्षेपांचा योग्य तो विचार करण्यात येईल. सदर सूचना व नकाशाची प्रत सिडकोचे संकेतस्थळ *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx* येथे उपलब्ध करण्यात आली आहे.

शिवाय, उक्त अधिनियमाच्या कलम २३ च्या उप कलम (२) अन्वये, विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शवीणारा नकाशा खाली नमूद केलेल्या कार्यालयांमध्ये, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांच्या अवलोकनार्थ साठ दिवसांसाठी उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(२) सिडकोचे नोंदणीकृत कार्यालय निर्मल, दुसरा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१.

(३) मुख्य नियोजनकार(नैना), सिडको, आठवा मजला, टॉवर क्र. १०, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

(४) रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग.

(५) उप संचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(६) सहायक संचालक, नगररचना, रायगड-अलिबाग.

(७) तहसीलदार कार्यालय, पनवेल/उरण.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**रविंद्रकुमार एम. मानकर,**
मुख्य नियोजनकार(नैना).

CIDCO LTD. NAINA NAVI MUMBAI

नोंदणीकृत कार्यालय :
निर्मल, दुसरा मजला, नरिमन पॉईंट,
मुंबई ४०० ०२१,
दिनांक : २६ ऑक्टोबर २०२१.